नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०७/२०२६ (रविवार)**

---

## अवैधरित्या विनापरवाना देशी, विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८,२४०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २५/०७/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पनघटबार ॲन्ड रेस्टॉरेंट समोरील खुल्या जागेत सावनेर येथे एक इसम **अवैधरीत्या देशी, विदेशी दारूची विक्री करीत** आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या आरोपी शुभम उर्फ प्रेमचंद दिनदयाल बेटवार, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं १६ याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यात असलेल्या खोक्यामध्ये तसेच थैलीमध्ये नमुद आरोपीचे ताब्यात देशी विदेशी दारू मिळुन आली. पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या ५६ निपा किंमती ४४८०/— रूपये तसेच वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या १६ निपा किंमती ३७६०/—रूपये मिळुन आले. असा एकुण ८२४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पंचासमक्ष दारू बाळगण्याबाबत परवाना विचारले असता तिने परवाना नसल्याचे सांगीतले.

**नमुद आरोपी शुभम उर्फ प्रेमचंद दिनदयाल बेटवार, वय २५ वर्षे, रा. वार्ड नं १६ याचेविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.
## एकुण ९६८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २५/०७/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन बेला, जलालखेडा, नरखेड यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ९६८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे अमित दादाराव राउत, वय ४१ वर्ष, रा. शेडेश्वर, ता. उमरेड, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे प्रमोद शंकरराव तूमसरे, वय ४२ वर्ष, रा. महेंद्री, ता. नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे नामदेव सुधाकर बालपांडे, वय ४९ वर्ष, रा. वार्ड क्र १३, नरखेड हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १७ गुन्हे नोंद

दिनांक २५/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण २४,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे 1) संतोश हरीचंद कळपेती, वय ३५ वर्ष, रा. भटटी टोला, दाहोदा रामटेक २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी १) गोविंदा बाबाराव मानकर, रा. आजनगाव, ता. काटोल, जि. नागपुर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी १) सुरज परसराम वाढीवे, वय २७ वर्ष, रा. अंबाडा देशमुख, तह. नरखेड २) वासुदेव भाउराव कुडे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५, सावरगाव तह. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** आरोपी १) विनोद भाकरु राजपाडे, वय ४४ वर्ष, रा. धर्मापुर भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर २) क्रिष्णा बंडुजी कोकाटे, वय ३७ वर्ष, रा. मोखाळा, ता. भिवापुर, जि. नागपुर ३) महिला आरोपी ४) विनोद भाकरु राजपाडे, वय ४४ वर्ष, रा. धर्मापुर भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर येथे** आरोपी १) निलेश शंकर रामटेके, वय ४० वर्ष, रा. केसोरी, ता. कुही जि. नागपुर २) नरहरी नामदेव मेश्राम, वय ४८ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही यांचेवर ०१ गुन्हा नोंद. तसेच आरोपी संदीप उर्फ भोला भगवान ठाकरे, वय ४१ वर्ष, रा. भिवकुंड, ता. कुही, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी राजेश धनराज तागडे, वय ४३ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** आरोपी आशिष माणिकराव चौहान, वय ३५ वर्ष, रा. इदिरा नगर, वार्ड नं १२, ता. कळमेश्वर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे** आरोपी शुभम उर्फ प्रेमचंद दिनदयाल बेटवार, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. १६, पहलेपार सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान येथे** आरोपी पियुष अजित शेंडे, वय २६ वर्ष, रा. न्यु मार्केट, नगर परिषदचा मागे, कन्हान, ता. पारशिवनी याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी चंदु ऊर्फ चंद्रप्रकाश वासूदेव वासे, वय ४६ वर्ष, रा. सातगाव रिधोरा, ता. हिंगणा, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २९१६० मिली देशी दारू, २८८० मिली विदेशी दारू, ७४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण २४,३००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**